# सायबर सुरक्षा विषयावर सेमिनार

देशोन्नती 01-12-2022



**अकोला** : स्थानिक जुने शहरातील रेणुका नगर येथील राजेश्वर कॉन्व्हेन्ट मध्ये सायबर गुन्हे आणि सायबर सुरक्षा या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले. शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स शीतल साखरे आणि नेहा टेरे यांनी इंटरनेट, मोबाईल, कॉम्प्युटरच्या सहायाने ऑनलाईनच्या माध्यमातून सायबर गुन्हे वेगवेगळया प्रकारे कसे होतात या विषयी सविस्तर माहिती सांगितली.

या सगळयांचा वापर सुरक्षित पने कसा करावा आणि आभासी जगात स्वत: कसे सुरक्षित राहावे या विषयी सेमिनारच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी मोबाईलचा योग्य वापर करण्याविषयी विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली आणि सुरक्षा माहितीपत्रक वाटप करण्यात आले.

शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. साबू , उपक्रमाचे समन्वयक भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली व क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि ठमहाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने सेमिनारचं आयोजन करण्यात आले होते.

कॉन्व्हेन्टच्या प्राचार्या सरिता वरनकार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .यावेळी ठाकूर मॅडम आणि शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.